# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २८ जुलै, २०१५ / श्रावण ६, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**<br>**(३) जलसंपदा मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५७**

---

### मौजे भाटसांगवी (ता.जि.बीड) येथील म.ग्रा.रो.ह.यो. मधील कामाची चौकशी करण्याबाबत

**(१) * ७५०१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ३६४६ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाटसांगवी (ता.जि.बीड) येथील म.ग्रा.रो.ह.यो. मधील कामाची तपासणी करण्यासाठी गटविकास अधिकारी, बीड यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास तीन चौकशी पथकांची स्थापना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी पथकांच्या अहवालातील निष्कर्ष कोणते आहेत,

(३) दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ रोजी मु.का.अ.जि.प., बीड यांनी दिलेला अहवाल दोषी व्यक्तींशी संगनमत करुन दिला असल्यामुळे चौकशी अधिकाऱ्याची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकाऱ्यांकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गैरव्यवहार आणि शासकीय रक्कमेचा अपहार करणाऱ्या दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) चौकशी पथकांच्या अहवालानुसार कामांमध्ये अनियमितता झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) होय.
(४) जिल्हाधिकारी, बीड यांच्या दिनांक ०७ मे, २०१५ च्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, बीड, उपविभागीय अधिकारी, बीड व उप अभियंता, मग्रारोहयो दक्षता पथक प्रमुख, बीड यांचे पथक फेर चौकशी करण्यासाठी नेमण्यात आले आहे. या पथकामार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाटण तालुक्यातील (जि.सातारा) कोयना धरणाच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा पुरविण्याबाबत**

**(२) * ७७७८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण तालुक्यामध्ये (जि.सातारा) सन १९५४ ते १९६७ या कालावधीमध्ये २७९७.४ दशलक्ष घनमीटर पाणी साठयाची क्षमता असलेले जलसिंचन व जलविद्युत उत्पादनासाठी कोयना हे धरण बांधण्यात आले असून या धरणाच्या सुरक्षेसाठी पुरेशी सशस्त्र पोलीस यंत्रणा अद्यापपर्यंत शासनामार्फत पुरविण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर धरणाला पुरेशी सुरक्षा पुरविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

कोयना धरणाची सुरक्षा व्यवस्थेसाठी महाराष्ट्र पोलीस यंत्रणे मार्फत सशस्त्र पोलीस तैनात करणेत आले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाडा तालुक्यात (जि.पालघर) आगीच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी अग्निशमन दल उभारण्याबाबत**

**(३) * ६८००  श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यात (जि.पालघर) रासायनिक कारखान्यांची संख्या वाढत असून अनेक वेळा छोटया-मोठया आगीच्या घटना घडत असल्यामुळे या परिसरात अन्य सुविधा व स्वतंत्र अग्निशमन दल उभारणीची मागणी स्थानिक पंचायत समिती सदस्यांकडून तसेच नागरिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ च्या अनुषंगाने या परिसरात वाढत्या आगीच्या घटना रोखण्यासाठी तात्काळ अग्निशमन दल उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय. वाडा तालुक्याकरीता स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा नसल्याकारणाने पंचायत समिती वाडा यांनी वाडा तालुक्याकरीता अग्निशमन विभाग मंजूर व्हावे असा ठराव सर्वानुमते दि.६.६.२०१५ रोजीच्या मासिक सभेत ठराव क्रमांक २८ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

(३) व (४) राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यांत राज्यस्तरीय अग्निशमन सेवा नसल्यामुळे ही सेवा नागरी स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्यामार्फत पुरविण्यात येते. सद्य:स्थितीत राज्यातील १३८ तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी नगरपालिका/नगरपंचायती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु असून यामध्ये वाडा तालुका मुख्यालय ग्रामपंचायतीचा समावेश आहे. याबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना या तालुक्यांना लागू करण्याचा विचार करण्यात येत आहे.

---------------------------

## मौजे पेठ खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) अंतर्गत हंसराज नगरचा भाग जयपुर लांडे ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(४) * ८१४६ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४१ ला दिनांक २३ मार्च २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.सुरेंद्रकुमार वल्लभदास पुरोहीत, रा."नर्मदा" हंसराज नगर, शेगांव रोड, खामगांव, जि.बुलढाणा यांनी तसेच श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या निवेदनानुसार व पत्रानुसार हंसराज नगर हा भाग जयपुर लांडे या गावात समाविष्ट करुन घेणेबाबत मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मौजे जयपुर लांडे या ग्राम पंचायतीने हंसराज नगर हा भाग सदर ग्राम पंचायतीमध्ये समाविष्ट करण्याबाबत ठराव मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हंसराज नगर हे त्रिशंकु क्षेत्र हे महसूली गांव म्हणून जाहीर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१३ रोजीच्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, बुलढाणा यांच्या पत्र क्र.शिरस्तेदार/कावि ४४९/खामगांव ग्रामीण महसुली गांव १४ बुलढाणा दिनांक १८ डिसेंबर, २०१४ च्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावामध्ये हंसराज नगरचे गट नं. सर्वे नंबर न दाखवता खामगांव ग्रामीणचे गट नं. व सर्वे नं. दाखविण्यात आले, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख बुलढाणा यांनी चुकीचा व शासनाची दिशाभुल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यामुळे अद्यापपर्यंत हंसराज नगर या भागाचा जयपूर लांडे या ग्राम पंचायतीमध्ये समावेश करण्यात दिरंगाई होत आहे, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, हंसराज नगर या भागाचा तात्काळ जयपुर लांडे या ग्राम पंचायतीमध्ये समावेश करण्याबाबत अथवा नविन ग्रामपंचायत घोषित करणार आहे काय,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे. खामगाव तालुक्यातील मौजे पेठ खामगाव अंतर्गत असलेले नगर परिषद हद्दीबाहेरील हंसराज नगर, संजीवनी कॉलनी व इतर अकृषक भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे अथवा इतर ग्रामपंचायतमध्ये समाविष्ट करणेसाठी सदरचे क्षेत्र हे स्वतंत्र महसुली गाव म्हणून घोषित होऊन मिळणेबाबत दिनांक १० डिसेंबर, २०१३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(४) होय, हे खरे आहे. जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, बुलढाणा यांच्याकडे खामगाव ग्रामीण हे महसुली गाव म्हणून घोषित करणेबाबतच्या प्राप्त प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या दिनांक १८ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(५) सदर प्रस्तावामध्ये खामगाव ग्रामीण मधील सर्व्हे क्र. दाखविण्यात आले आहेत. या प्रस्तावातील खामगाव ग्रामीण मधील सर्व्हे नं.१४३, १४४, १४५ व १४७ या सर्व्हे नंबरमध्ये हंसराजनगर हा भाग येत असून, मुळ महसुली नकाशाप्रमाणे तो पेठ खामगावचाच भाग आहे.

(६) हे खरे नाही. अभिलेखाप्रमाणे नकाशातील सर्व सलग सर्व्हे नं.चा मिळून खामगाव ग्रामीण महसूली गाव घोषित करणेबाबत बंदीस्त स्वरुपाचा नकाशा सादर केला असून, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(७) व (८) नगररचनाकार बुलढाणा यांनी त्यांच्या दिनांक ०६.०६.२०१५ रोजीच्या पत्रानुसार खामगाव ग्रामीण महसुली गाव घोषित करण्यास हरकत नसल्याबाबतचा अभिप्राय सादर केला असून, त्यानुसार हंसराज नगरसह संजीवनी कॉलनी, संत तुकाराम कॉलनी, गोपाळकृष्ण कॉलनी, राणा लकी शॉवर पुष्पक नगर, मानवधर्म महाराजा रेसीडेन्सी, आदर्श नगर, शिक्षक कॉलनी या अकृषक भागासाठी खामगाव ग्रामीण हे महसुली गाव घोषित करण्यास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक ०८.०७.२०१५ रोजी तत्वतः मान्यता दिलेली असून, याबाबतची अधिसूचना निर्गमित होताच सदरच्या महसुली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत अथवा नजिकच्या इतर ग्रामपंचायतीमध्ये सदर क्षेत्र समाविष्ट करणेबाबत नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणामध्ये प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून काम केलेल्या शिक्षकांना मानधन न मिळाल्याबाबत**

**(५) * ८०८३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मे, २०११ मध्ये सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणाच्या कामासाठी अनेक शिक्षकांना प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून नियुक्त्या दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षकांना सुट्टीमध्ये केलेल्या कामाचा मोबदला/मानधन अद्यापही देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दि. २८ जून, २०१४ रोजी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासाठी लागणारा सुमारे ३४ कोटी वाढीव निधी केंद्र शासनाकडून प्राप्त करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाकरीता केंद्र शासनाकडून निधी वितरीत करण्यात आलेला आहे. परंतु सर्वेक्षणाचा कालावधी वाढल्यामुळे केंद्र शासनाने यापूर्वी वितरीत केलेला निधी अपुरा पडलेला आहे. यास्तव काही ठिकाणी सर्वेक्षणाकरीता नियुक्त केलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांना साधारणत: ५० ते ७५% इतके मानधन वाटप करण्यात आलेले आहे.

(३) होय.

(४) व (५) सदर सर्वेक्षणाकरीता लागणारा अतिरिक्त निधीची मागणी केंद्र शासनाकडे दिनांक १७.१२.२०१३, दिनांक २३.०७.२०१४ व दिनांक १२.०८.२०१४ च्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे. तसेच ही बाब नवी दिल्ली येथे दिनांक १९.०९.२०१४ व दिनांक १४.०१.२०१५ रोजी झालेल्या कामकाज आढावा समिती मध्ये केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होताच प्रगणक / पर्यवेक्षकांच्या मानधनाकरीता निधी वितरीत करण्यात येईल.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात कृषी विभागामार्फत हाती घेण्यात आलेली कोट्यवधी रुपयांची कामे निकृष्ट होत असल्याबाबत

**(६) * ७९०७ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी कृषी विभागामार्फत हाती घेण्यात आलेली कोट्यवधी रुपयांची कामे निकृष्ट होत आहेत, या विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे मोठा निधी व्यर्थ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी सहसंचालक आणि उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी माहे एप्रिल व मे, २०१५ या महिन्यात काही गावांना भेटी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही गावांमध्ये विविध योजने अंतर्गत कामे करण्यात आली, सर्व नियम बाजूला ठेवत कामे उरकून देयकेही काढण्यात आली, याबाबतच्या तक्रारीही शासनाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे स्वरुप काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

विभागीय कृषी सहसंचालक व उपविभागीय कृषी अधिकारी यांना विविध योजनांमधील कामे योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमधील मापदंडानुसार तपासणी करणे आवश्यक असते त्याप्रमाणे ही नियमित तपासणी झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा सिंचन प्रकल्पाबाबत

**(७) * ७१२९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा सिंचन प्रकल्पाखालील डेहणी ठिबक उपसा सिंचन योजना पूर्णत्वास आली असून अद्याप कार्यान्वित झाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी टप्पा-१ व टप्पा-२ कधीपर्यंत शेतकऱ्यांना ठिबकद्वारे पाणी देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. योजनेची कामे पुर्ण झालेली नाहीत. तथापि योजनेचे सिंचनाचे लाभ मिळण्यास सुरवात झाली आहे.

(२) टप्पा-१ मधील लाभधारकांना खरीप २०१५ हंगामात सुमारे २००० हे. लाभक्षेत्रास ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्यात येत आहे.

टप्पा-२ मधील लाभधारकांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्याचे काम निधी उपलब्धते नुसार जून-२०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) योजनेचे लाभक्षेत्र ६९९८ हेक्टर आहे.या क्षेत्रास दोन उपसा टप्प्यात लाभ देण्यात येणार आहेत. योजनेच्या कामाची दोन फेज मध्ये विभागणी करण्यात आली आहे. फेज १ मध्ये पाणी उपसा करुन झोनल संप पर्यंत पाणी वितरणाची कामे अंतर्भूत आहेत. तर फेज २ मध्ये झोनल संप पासून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंतचे पाईपलाईन वितरण प्रणालिचे काम अंतर्भूत आहेत. फेज १ मधील ८५% कामे पूर्ण झाली असून फेज २ मधील ६५% कामे पूर्ण झाली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचांदूर ग्रामीण रुग्णालय (जि.चंद्रपूर) येथे कुटूंब नियोजन व जननी सुरक्षा योजनेच्या अनुदान वाटपात झालेला गैरव्यवहार

**(८) * ७४३८ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर ग्रामीण रुग्णालय (जि.चंद्रपूर) येथे कुटूंब नियोजन व जननी सुरक्षा योजनेचे अनुदान लाभार्थ्यांना न देता संबंधीत रुग्णालयातील लिपीक यांनी गैरव्यवहार केल्याचे दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय गडचांदूर येथील एकूण ३३३ शस्त्रक्रियांपैकी २४८ लाभार्थीना मोबदला देण्यात आला असून ८५ लाभार्थीना तसेच सर्जन व इतर सपोर्ट स्टाफला मोबदला देण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे जननीसुरक्षा योजनेअंतर्गत २६४ लाभार्थ्यांपैकी ९७ लाभार्थ्यांना मोबदला दिला व १६७ लाभार्थ्यांना मोबदला दिलेला नाही. तसेच २६४ प्रोत्साहकांपैकी ९८ प्रोत्साहकास मोबदला दिलेला आहे व १६६ प्रोत्साहकास मोबदला दिलेला नाही.

(२) उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालानुसार सदर प्रकरणी वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय गडचांदूर तसेच कनिष्ठ लिपीक दोषी दिसून येत असल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या

**(९) * ७८०० श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अनिल तटकरे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवा व महाराष्ट्राच्या तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मागण्याकरिता दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पासाठी सर्वस्वाचा त्याग केलेल्या तिलारीतील विस्थापित धरणग्रस्तांना देय असलेल्या घरे, एक सरकारी नोकरीचा प्रश्न मागील ३५ वर्षापासून प्रलंबित असून रोजगारअभावी प्रकल्पग्रस्तांची कुटूंबे प्रचंड आर्थिक संकटात सापडली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या शासनाने पूर्ण केल्या नाहीतर जलसमाधी घेण्याचा निर्णय त्यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना लेखी निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वनटाइम सेटलमेंट देय असलेली रक्कम देण्याचे आश्वासन शासनाकडून देवून याबाबतची अंमलबजावणी अद्यापही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना वन टाइम सेटलमेंट रक्कम देण्यात काय अडचणी आहेत व प्रकल्पग्रस्तांना देय असलेली रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी कोणकोणत्या मागण्या शासनाकडे केल्या आहेत,

(७) असल्यास, याबाबत शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४), (५), (६) व (७) हे खरे नाही. तिलारी हा महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमधील आंतरराज्य प्रकल्प आहे. तिलारी प्रकल्पातंर्गत बुडीत क्षेत्रातील पात्र प्रकल्पग्रस्त कुटुंबांची संख्या १११० आहे. त्यापैकी एकूण १६३ प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या विविध खात्यात नोकरी देण्यात आली आहे. उर्वरित ९४७ प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरकमी रु.५ लक्ष इतके अनुदान देण्याचा निर्णय एक विशेष बाब म्हणून दिनांक १७.६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई दिंडोशीजवळ**
**हरीतपट्टा/वनराई नष्ट करण्यात आल्याबाबत**

**(१०) * ६६८० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई दिंडोशीजवळ सुमारे २५ एकर जागेवरील हरीतपट्टा/वनराई नष्ट करण्यात आल्याचे दिनांक २२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिंडोशी जवळील ही जागा बफर झोनमध्ये येत असतानासुध्दा तेथील वनराई नष्ट करण्यात आली असून सन २०१४ मध्ये आग लावून हरीत पट्टा जाळण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) दिनांक २२.०५.२०१५ रोजी महाराष्ट्र टाइम्स या दैनिक वृत्तपत्रात “नॅशनल पार्कातील डोंगर कापला” या विषयावर प्रसिध्द झालेल्या बातमींच्या अनुषंगाने सहाय्यक वनसंरक्षक यांनी चौकशी केली असता सदर क्षेत्र हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बाहेरील खाजगी क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरचे क्षेत्र खाजगी क्षेत्र असल्याने वनविभागामार्फत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निळवंडे धरणाच्या (जि.अहमदनगर) कॅनॉलचे**
**काम पूर्ण करण्याबाबत**

**(११) * ७५७६ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील निळवंडे धरणाच्या कॅनॉलसाठी शासनाने यावर्षी अतिशय कमी निधी दिला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरण पूर्ण झाले असून कालवे तातडीने पूर्ण करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात निळवंडे प्रकल्पाच्या कालव्यांसाठी रु.२३.१० कोटी अनुदान मंजूर आहे.
(२) निधीचे उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव**

**(१२) * ८०२८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८१० ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्यामुळे पश्चिमवाहीनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबतचे मांजरपाडासह इतर १७ वळण योजना तसेच दरसवाडी पोहोच कालवा, इत्यादी योजनांची केवळ १०/२० टक्के अपुर्ण कामे रखडल्याबाबत स्थानिक लोकप्रनिनिधींनी माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मांजरपाडा वळण योजनेसाठी सन २०१५-१६ साठी ७० कोटी अनुदान मंजुर असूनही केवळ सुप्रमा अभावी निधी खर्च करता येत नसल्याने या प्रकल्पाचे काम बंद पडले असून सदर प्रकल्पासाठी मंजुर निधी खर्च करण्यासाठी शासनाने परवानगी देण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मांजरपाडा वळण २ योजना कार्यान्वित होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र जलसंपत्ती अधिनियम २००५ कलम ११ च नुसार नवीन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी प्राधिकरणाची मान्यता घेणे गरजेचे आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाने प्राधिकरणास दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी पाठविला होता. तथापि मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशाशी प्रस्ताव सुसंगत नसल्याने तसेच तापी खो-यातील गिरणा उपखो-याचा जल आराखडा अंतिम नसल्याने प्रस्ताव मान्यतेशिवाय परत केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात गरीब रुग्णांची आर्थिक पिळवणूक होत असल्याबाबत

**(१३) * ७००७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात विविध आजाराने त्रस्त असणारे रुग्ण दाखल होत असून या रुग्णांना तात्काळ सेवा सुविधा मिळावी याकरीता २४ तास तात्काळ सेवा देणारा विभाग सुरु आहे. परंतु सदर रुग्णालयात रुग्णांना तपासून झाल्यावर रुग्णालयातील औषधे न देता त्यांना बाहेरील (मेडिकल) औषधे लिहून दिली जात असल्याचे तसेच परिचारीकाची वागणूक उर्मट असल्याचे माहे ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालयात गरीब रुग्णांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही. उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर जि.सोलापूर येथे बाहयरुग्ण व आंतररुग्ण विभागातून रुग्णांची तपासणी केल्यानंतर रुग्णांना रुग्णालयातील उपलब्ध औषध साठ्यांमधील औषधे दिली जातात. वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णांची तपासणी केल्यानंतर जी औषधे भांडारात उपलब्ध नाहीत अशी औषधे स्थानिकरित्या खरेदी करुन रुग्णांना दिली जातात. रुग्णालयातील औषधे न देता रुग्णांना बाहेरुन औषधे लिहून दिली जात असल्याबाबतची तक्रार किंवा निदर्शनास आले नाही. तसेच परिचारिका यांची रुग्णांशी वागणूक चांगली असून परिचारीकांची वागणूक उर्मट असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, दिनांक ११.०५.२०१५ रोजी रुग्णांचे नातेवाईक व परिचारीका यांच्यात रुग्णास अतिदक्षता विभागातून सामान्य कक्षात का वर्ग केले याकारणावरुन वाद झाले होते. यामुळे त्यांनी परस्पर एकमेकांविरुध्द पोलिस ठाणे, पंढरपूर येथे तक्रार नोंदविली आहे. पोलीसामार्फत त्याबाबतची चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यातील रुग्णालयांमध्ये “प्लेटलेट” तयार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१४) * ८०९४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २९४० ला दिनांक २३ मार्च २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डेंग्यु, मलेरिया या आजाराच्या रुग्णांना “प्लेटलेट” उपलब्ध करुन देण्याचे धोरणांतर्गत राज्य शासनाच्या ३४ जिल्हास्तरीय रुग्णालय स्थित रक्तपेढयांपैकी ९ ठिकाणी प्लेटलेट तयार करण्याची सुविधा उभारण्याचे सुरु असलेले कामकाज पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वच जिल्हा रुग्णालयात प्लेटलेट तयार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, सदरहु कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे व यासाठी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही.

९ जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढयांच्या ठिकाणी प्लेटलेट तयार करण्याची सुविधा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) आतापर्यंत २५ जिल्ह्यांमध्ये ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) येत्या १ वर्षात उक्त कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात पैनगंगा अभयारण्यातील खरबी व उमरखेड वनपरिक्षेत्रामध्ये होणारी अवैध वृक्षतोड व रेती तस्करी**

**(१५) * ७६२५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात पैनगंगा अभयारण्यांतर्गत खरबी व उमरखेड जंगलात अवैध वृक्षतोड व रेती तस्करी होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरबी जंगलात अवैध वृक्षतोड तसेच वन्यजीव विभागातून पैनगंगा नदी वाहते मात्र या जंगलातील रेती धाराचा लिलाव नियमानुसार केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जंगलातील घाटावरुन मराठवाडा तसेच खबी, टाकळी, दराटी येथील वाळू माफियांनी रेतीची तस्करी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवैध वृक्षतोड व रेती तस्करी चालू देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगा अभयारण्यातील खरबी व उमरखेड या वनपरिक्षेत्रापैकी खरबी वनपरिक्षेत्रात अवैध वृक्षतोड व वाळू तस्करी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) माहे मे, २०१५ मध्ये खरबी वनपरिक्षेत्रात ५१ साग वृक्ष व २० आडजात वृक्षांची तोड झाली असून त्यापैकी रुपये १६,४७८/- इतक्या किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. मौजा खरबी टाकळी रेतीघाट अभयारण्य क्षेत्रात येत असल्याने सदर रेतीघाटांचा लिलाव करण्यात येत नाही.

(३) जंगलातील घटावरुन अवैधरीत्या रेती वाहतूक करणाऱ्याविरुद्ध गुन्हे नोंदवून ५ ट्रॅक्टर पकडण्यात आले आहेत.

(४) व (५) अवैध वृक्षतोड व रेती तस्करीकरीता जबाबदार असणाऱ्या वनक्षेत्रपाल-१, वनपाल-१ व वनरक्षक-३ अशा एकूण ३ अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिनांक १५.०५.२०१५ रोजी निलंबीत करण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## गटविकास अधिकारी, मुरबाड (जि.ठाणे) यांच्या मनमानी कारभाराबाबत

**(१६) * ६७०१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड तालुक्यातील घरकुल, शौचालये, पाणीपुरवठा, जनसुविधा योजनांतील गैरव्यवहार, आरोग्य, शाळांची दुरवस्था तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक यांचा मनमानी गैरकारभार याबाबत ग्रामस्थांनी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांचेकडे लेखी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरबाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सरपंच व ग्रामसेवक यांचे विरुध्द तक्रार दाखल होवूनही कोणतीही कार्यवाही केली जात नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सरळगाव ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी गैरकारभाराबाबत अनेक तक्रारी करुनही गटविकास अधिकारी गैरकारभाराची चौकशी करीत नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, गैरकारभाराच्या तक्रारी येत असून देखील कोणतीच कार्यवाही न करणाऱ्या गटविकास अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.

मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत सरळगांव येथील सरपंच व ग्रामसेवक यांचे गैर कारभाराबाबत तक्रारी आहेत. तसेच ग्रामीण पाणी पुरवठाबाबत तक्रारी आहेत. तथापि, घरकुल, शौचालये, जनसुविधा योजनांतील गैरव्यवहार, आरोग्य, शाळांची दुरवस्था याबाबत तक्रारी नाहीत.

(२) नाही.

सरळगांव ग्रामपंचायत, तालुका मुरबाड येथील ग्रामपंचायतीच्या व्यापारी संकुलाच्या कामाबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) जिल्हा परिषद, ठाणे यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

(३) नाही.

गट विकास अधिकाऱ्यांनी सरळगांव ग्रामपंचायतींच्या गैरकारभाराबाबत चौकशी केली असता गैरकारभार झालेला नसल्याचे कळविले आहे. मात्र सदर बाबत जिल्हास्तरावरुन सखोल चौकशी सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैद्यकीय उपचारांचे दर निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्टची अंमलबजावणी करणेबाबत**

**(१७) * ६९६७ श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय उपचारांचे दर निश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने देशभरात कायदा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात या कायदयात सुधारणा करण्यासाठी आरोग्य चळवळीतील १९ तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमली आहे या समितीने 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' चा मसुदा तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' ची तातडीने अंमलबजावणी करण्याची गरज आहे प्रत्येक हॉस्पिटलमधील बेड, रक्त व इतर तपासण्या, एक्स रे, अल्ट्रा सोनोग्राफी यांचे दरपत्रक प्रत्येक हॉस्पिटलच्या दर्शनी भागात लावण्याची सक्ती असल्याने खासगी हॉस्पिटलांकडून सर्वसामान्य व गरीब पेशंटची होणारी लूटमार थांबणार असल्याने तातडीने या कायदयांची अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, या कायदयांची अंमलबजावणी करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. दरपत्रक लावणे यासंबंधी तरतूद आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर कायद्याचे प्रारुप, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, विधी व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, गृह विभाग, पर्यावरण विभाग, या विभागांना अभिप्रायार्थ पाठविण्यात आले होते. सदर विभागांपैकी वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, विधी व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगर विकास विभाग यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त विभागापैकी पर्यावरण विभाग या विभागाकडून जैविक कच-याची विल्हेवाट लावणे या मुद्दयांवर अभिप्राय अप्राप्त आहेत.

सदर विभागांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या अभिप्रायासहीत प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येईल मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपळगाव जोगा (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे बिबट्यांच्या हल्लात झालेले मृत्यु**

**(१८) * ८५५२ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव जोगा (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे अंगणात झोपलेल्या वृद्ध महिलेवर बिबट्याने हल्ला करुन, याआधी बिबट्याच्या हल्ल्यात तीन व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे दिनांक २७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबट्याचा बंदोबस्त तसेच मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबियांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक २६.०५.२०१५ रोजी श्रीमती सखुबाई नानाभाऊ हिले, रा.पिंपळगाव जोगा, (ता.जुन्नर, जि.पुणे) वय ५५ वर्ष यांचा बिबटयाच्या हल्ल्यांत मृत्यू झाला आहे. बिबटयांच्या हल्ल्यांत दिनांक १६.११.२०१४ रोजी पांगरी तर्फे मढ या ठिकाणी श्रीमती सखुबाई दादाभाऊ वारे, रा.ओतूर-तेलदरा, ता.जुन्नर, दिनांक १७.०४.२०१५ रोजी खामुंडी येथे श्री.प्रविण देवराम दुधवडे, रा.पिंपळगांवमाथा, ता.संगमनेर, तसेच दिनांक ०३.०५.२०१५ रोजी डिंगोरे येथे श्री.साई संतोष मंडलिक, रा.डिंगोरे, ता.जुन्नर अशा ३ जणांचा मृत्यू झालेला आहे.

(२) व (३) बिबटे हल्ल्यांमध्ये मृत व्यक्तींच्या वारस नातेवाईकांना प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार श्रीमती सखुबाई दादाभाऊ वारे यांचे वारस नातेवाईक यांना रु. ५ लक्ष तर उर्वरित ३ मृतांच्या वारस नातेवाईकांना प्रत्येकी रु. ८ लक्ष अशी एकूण रुपये २९ लक्ष आर्थिक मदत (सानुग्रह रक्कम) देण्यात आली आहे.

बिबटयाच्या बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- जलद बचाव गटाची स्थापना करुन गस्त वाढविण्यात आली आहे.
- पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
- पिंजरे लावून बिबट बंदिस्त करणे.

- घडी पत्रिका, पोस्टर्स दृकश्राव्य माध्यमांद्वारे जनजागृती व प्रबोधन, ग्रामस्थांचे सहभागातून विशेष पथके, कार्यशाळा व वन्यजीव अभ्यासकांचे मार्गदर्शन तसेच वनविभागातील इतर वनपिरक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांची या परिसरात गस्तीसाठी पथके निर्माण करण्यात आली आहेत.

-----------------

**कांडली (ता.भोकर, जि.नांदेड) येथे रानडुक्कराच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्यास आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत**

**(१९) * ८९३५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांडली (ता.भोकर, जि.नांदेड) येथील शेतकरी पोतन्ना हुसन्ना मुचलवाड हे शेतात पत्नीसह काम करीत असताना त्यांच्यावर रानडुकराने दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास हल्ला केल्याने ते गंभीर जखमी झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पती पत्नीला रानडुकरांच्या हल्ल्यानंतर उपचारार्थ नांदेडच्या गुरुगोविंदसिंगजी स्मारक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सदरहू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) कांडली (ता.भोकर, जि.नांदेड) येथे शेतात दिनांक १७.०४.२०१५ रोजी पोतन्ना हुसन्न मुचलवाढ व त्यांची पत्नी शेतकाम करीत असताना रानडुक्कराने हल्ला करुन सदर पती पत्नीस किरकोळ जखमी केले आहे.

सदर पती व पत्नी यांनी भोकर येथील शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार घेऊन पुढील उपचार गुरुगोविंदसिंगजी स्मारक रुग्णालयात घेतला आहे.

उपरोक्त प्रकरणी जखमी व्यक्तीस प्रत्येकी रु.७,५००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## जुने व्हाइट हाऊस (ता.येरवडा, जि.पुणे) येथे वास्तव्य करणाऱ्या सफाई कामगारांना जागा सोडण्याच्या दिलेल्या नोटीसा

**(२०) * ८९७७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्हाइट हाऊस (ता.येरवडा, जि.पुणे) येथे मागील १०० वर्षापासून वास्तव्य करणाऱ्या सफाई कामगारांना संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने जागा सोडण्याच्या नोटीसा दिल्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रिटीश काळापासून वाल्मीकी समाजाचे सफाई कामगार नोकरीला होते तेव्हापासून या समाजातील काही कुटुंबे उक्त परिसरात अद्याप पर्यत वास्तव्य करीत असुन अचानक १०० वर्षाने त्यांना जागा सोडण्यात सांगण्यात येत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. व्हाईट हाऊस ही मिळकत न्यायालयीन आदेशान्वये आता राज्य शासनाच्या मालकीची राहिलेली नाही. या ठिकाणी राहणाऱ्या ७ कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानांमध्ये स्थलांतरीत करण्याचे दिनांक ०२.१२.२०१४ व दिनांक १६.१२.२०१४ च्या आदेशान्वये रुग्णालय प्रशासनाने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विमानतळावरुन दुर्मिळ १८३ कासवांची तस्करी करणाऱ्या व्यक्तींना केलेली अटक

**(२१) * ९११८ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळावरुन दुर्मिळ १८३ कासवांची तस्करी करणाऱ्या दोन व्यक्तींना हवाई गुप्तचर विभागाने अटक करुन कासवांची सुटका केल्याची घटना दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कासवांची तस्करी करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणात कस्टम विभागाने कस्टम अधिनियम १९६२ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम अंतर्गत पकडलेले आरोपी व मुद्देमालाचा पंचनामा, जबाब तयार करुन वन विभागाचे ताब्यात दिले. सदर आरोपी विरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९,३४,४८ ए, ४९ व ५१ नुसार गुन्हा नोंदविण्यात येऊन आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. सद्यस्थितीत आरोपींना जमीन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी शहरात मुले पोलिओ डोसपासून वंचित असल्याबाबत

**(२२) * १०३०५ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरात २० हजार मुले पोलिओ डोसपासून वंचित असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व यानुसार भिवंडी शहरातील मुले पोलिओ डोसपासून वंचित राहू नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक २१.०६.२०१५ च्या पल्सपोलिओ मोहिमे मध्ये ८६८०१ लाभार्थीपैकी, मोहिमेच्या दिवशी बुथवर व त्यापुढे ५ दिवस प्रत्यक्ष घरोघरी दिलेल्या भेटीद्वारे एकुण ७७०७६ लाभार्थींना पोलिओ डोस पाजण्यात आलेले आहेत. या मोहिमेमध्ये आजारी तथा नकार देणारे व्यतिरिक्त एकूण ८९% इतक्या मुलांचे पल्स पोलीओचे लसीकरण करण्यात आले आहे. पल्स पोलीओ मोहिमेच्या पुढील टप्प्यात लाभार्थी मुलापैकी पोलीओ डोस पासून कोणीही वंचीत राहणार नाही यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

(२) भिवंडी परिसरातील मुले पोलिओ डोसपासून वंचित राहू नये म्हणून पालकांचा गैरसमज दुर करणेसाठी महानगरपालिकेने समाजातील विशिष्ट घटकाची मदत घेतली आहे. तसेच या व्यतिरिक्त भिवंडी परिसरात जागतिक आरोग्य संघटनेमार्फत २५ फील्ड व्हॉलीटीअरर्स नेमण्यात आले असून ते घरोघरी भेटी देवून लसीकरणाबाबत जनजागृती करतात. तसेच भिवंडी परिसरात महिलांच्या विशेष सभा घेण्यात येवून त्यांना लसीकरण कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये स्पेशालिस्ट**
**डॉक्टर्सची उणीव भासत असल्याबाबत**

**(२३) * १०३५७ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टर्सची उणीव भासत असल्याने सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत विविध विषयातील २ वर्षाचा कालावधी असलेले नवे ८ पदवीका अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन ८ डिप्लोमा अभ्यासक्रम कोणकोणत्या विषयातील आहेत,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) नेत्ररोग, स्त्रीरोग व प्रसुती, बालरोग, शरीर विकृतीशास्त्र, भूल, मानसोपचार, क्षयरोग, रक्तसंक्रमण या आठ विषयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहेत.
(३) सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ पासून करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

**(२४) * १०६०४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात ग्रामीण भागातील रस्ते कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत (डीपीसी) ११ कोटी ८५ लाखांचा निधी उपलब्ध असूनही, जिल्हा परिषदेच्या कारभारात रस्ते कामांसाठी निविदा आणि कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देण्याची प्रक्रिया अदयापही पूर्ण करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरिता सन २०१४-१५ या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत डीपीसी मार्फत जिल्ह्यातील ६९ रस्ते कामांसाठी ११ कोटी ८५ लाखांचा निधी जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन देण्यात आलेला असूनही सदर कामाची निविदा व कार्यारंभ आदेशाची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागातल्या रस्त्यांची कामे जिल्हा परिषदेतच अडकलेले असून सुमारे १२ कोटीची कामे रखडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, ःचौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. आता पर्यंत १० कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून ५० कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीमध्ये आहे. तसेच ९ कामे स्थायी समितीकडे प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्तावित आहेत. ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित असून आचारसंहिता संपताच निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुण्यातील धरणातील पाणीसाठा कमी झाल्याबाबत**

**(२५) * १०६१४ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील धरणाच्या पाणीसाठयात मागील वर्षाच्या तुलनेत अर्धा अब्ज घनफुट (टीएससी) इतके पाणी कमी असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरासाठी चार प्रमुख धरणांमधुन पाणी उपलब्ध करुन दिले जाते, या चार धरणापैकी टेमघर या धरणाच्या साठयात काही पाणी सध्या शिल्लक नाही, पुणे मनपाकडून शेतीसाठी प्रक्रिया केलेले तीन टीएमसी पाणी उपलब्ध होणार होते परंतू याकरिता आवश्यक पाईपलाईनला न्यायालयाने स्थगिती दिल्याने पुण्यातील पाणीटंचाईमध्ये भर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

पुणे शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रणालीमध्ये माहे मे २०१५ मध्ये ५.२५ टिएमसी पाणीसाठा होता व तो मागील वर्षीच्या ४.४५ टिएमसी पेक्षा ०.८० टिएमसीने जास्त होता.

(२) हे अंशत: खरे आहे.

पुणे शहरासाठी खडकवासला प्रणालीमधील खडकवासला, पानशेत, वरसगांव व टेमघर या चार धरणांच्या एकत्रित पाणी पुरवठा करण्यात येतो.

पुणे महानगरपालिकेच्या मुळा-मुठा नदीतून प्रक्रिया केलेले सांडपाणी जुना मुठा उजवा कालव्यात उपलब्ध करुन देण्याच्या योजनेअंतर्गत दाबनलिका टाकण्याच्या कामास स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केल्याने त्या कामास न्यायालयाने स्थगिती दिलेली होती. सदर स्थगिती न्यायालयाने उठविलेली असल्याने पुणे महानगरपालिकेमार्फत सदरचे काम पुन:श्च प्रगतीपथावर आहे.

खडकवासला प्रणालीमध्ये माहे जून २०१५ मधील पावसामुळे पुरेसा पाणीसाठा झालेला आहे. दिनांक ०७/०७/२०१५ रोजी पुणे शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रणालीमध्ये ७.२६ टिएमसी पाणीसाठा आहे. त्यामुळे पुणे शहरास सद्य:स्थितीत पाणी टंचाई होणार नाही.

(३) जून-जुलै २०१५ मध्ये संभावित पाणीटंचाई सदृष्य परिस्थिती उद्भवू नये याकरिता महानगरपालिकेने पाणीवापरामध्ये बचतीच्या आवश्यक उपाययोजना हाती घेणेबाबत व सद्य:स्थितीत होणारा पाणीवापर कमी करणेबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत विंनती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नसरापूर (जि.पुणे) वनपरिक्षेत्राच्या हद्दीत बनेश्वर तसेच नसरापूर परिसर व वेल्हे तालुक्यात चंदनाच्या झाडांची होत असलेली चोरी

**(२६) * १०६४० श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नसरापूर (जि.पुणे) वनपरिक्षेत्राच्या हद्दीत बनेश्वर तसेच नसरापूर परिसर व वेल्हे तालुक्यात मोठया प्रमाणात चंदनाच्या झाडांची चोरी होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने चंदनाच्या झाडांची चोरी रोखण्यासाठी व दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) बनेश्वर व वेल्हे तालुक्यात चंदनाच्या झाडांची तोड आढळून आलेली नाही. तथापि, नसरापूर वनक्षेत्राच्या हद्दीत मौजे नसरापूर वनकक्ष क्र.३४७ मध्ये दोन चंदन वृक्षांची दिनांक ११.०५.२०१५ रोजी वृक्षतोड केल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) सदर प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध दिनांक ११.०५.२०१५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणातील आरोपी व मालाचा शोध घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्नाळा (जि.रायगड) या पक्षी अभयारण्यातील पनवेल ते इंदापूर या महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी वृक्षांची होणारी तोड

**(२७) * १०७२४ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाळा (जि.रायगड) या पक्षी अभयारण्यातील पनवेल ते इंदापूर या महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी सुमारे एक हजार वृक्ष तोडण्यात येणार असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी करण्यात येणाऱ्या वृक्षांची कत्तल रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंचायत समिती सासवड (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे प्रगणक या पदावर नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका व ग्रामसेवकांना कामाचा मोबदला मिळण्याबाबत**

**(२८) * १०८७३ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १३४९ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती सासवड (ता.पुरंदर, जि.पुणे) अंतर्गत सन २०१०-११ मध्ये प्रगणक या पदावर सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणाकरीता नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका व ग्रामसेवकांना कामाचा ५०% मोबदला मिळण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अतिरिक्त निधीच्या केलेल्या मागणीनुसार केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निधी प्राप्त होऊन अद्याप सर्व संबंधितांना वाटप न करण्याची कारणे काय आहेत,
(३) अद्याप निधी अप्राप्त असल्यास राज्य शासनाने केंद्र शासनाकडे किती आणि केव्हा निधीची मागणी करण्यात आली आहे,
(४) अद्याप निधी न मिळण्याची कारणे काय आहेत व निधी तातडीने प्राप्त होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करणात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ करीता आवश्यक असणा-या अतिरिक्त निधीची मागणी शासनाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१३ व दिनांक २३ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये केंद्र शासनास करण्यात आलेली असून साधारणतः रुपये ४० कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच सदरील बाब दिनांक १९ सप्टेंबर, २०१४ व दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या कामकाज आढावा समितीच्या बैठकीमध्ये केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन प्रकल्पावरील बंदी उठवण्याबाबत**

**(२९) * ७५०२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९४० ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नविन प्रकल्पावरील बंदी उठविण्यासाठी तत्कालीन मंत्रीमंडळाने मा. राज्यपाल यांच्याकडे प्रस्ताव पाठविला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक ५/८/१४ रोजी मराठवाडयातील १८ टी.एम.सी. बृहत आराखडयातील प्रकल्पांना मान्यता देण्याची विनंती मा.राज्यपाल यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, गोदावरी खोऱ्यातील १८ टी.एम.सी. पाण्याच्या बृहत आराखडयातील मंजुर प्रकल्पांची कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) होय,
(३) व (४) मा. राज्यपाल यांचकडून अद्याप मान्यता प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बालगुन्हेगारांचे वय कमी करण्याबाबत**

**(३०) * ७७६७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालगुन्हेगारांकडून मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत असल्याने बालगुन्हेगारांचे वय १८ वर्षावरुन १६ वर्षे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार बालगुन्हेगारांचे वय १६ वर्षे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० व सुधारीत अधिनियम २००६ नुसार "बाल" किंवा "मूल" याचा अर्थ ज्यास वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती असा आहे.

बालगुन्हेगारांचे वय १८ वर्षावरुन १६ वर्ष करणे किंवा त्यामध्ये बदल करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोढाणे धरणासह बाळगंगा, शाई, काळू आदि प्रकल्पांचे काम सुरू करण्यापूर्वी पर्यावरण विषयक परवानगी घेतली नसल्याबाबत**

**(३१) * ९६२१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोढाणे धरणासह बाळगंगा, शाई, काळू आदि प्रकल्पांचे काम सुरू करण्यापूर्वी पर्यावरण विषयक परवानगी घेतली नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

बाळगंगा, शाई, काळू हे पाणीपुरवठा प्रकल्प असल्याने केंद्र शासनाच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मान्यतेची आवश्यकता नाही.

कोंढाणे प्रकल्पाला केंद्र शासनाच्या २००६ च्या अधिसुचनेप्रमाणे पर्यावरण विषयक मान्यता आवश्यक होती, तथापि, आता केंद्र शासनाच्या २५ जून, २०१४ च्या अधिसुचनेप्रमाणे पर्यावरण विषयक मान्यतेतची आवश्यकता नाही.
(२) चौकशीबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील टिपेश्वर अभयारण्याची विकास कामे करण्याबाबत**

**(३२) * १०५३२ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील टिपेश्वर अभयारण्याचा दर्जा देऊन कोणतीही आर्थिक तरतूद केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, आर्थिक तरतूद न केल्याने कोणतीही विकास कामे झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अभयारण्याची विकास कामे तातडीने व्हावी म्हणून आर्थिक तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

पेंच व्याघ्र प्रकल्पाचे अंतर्गत टिपेश्वर अभयारण्याचा समावेश आहे. टिपेश्वर अभयारण्याच्या संरक्षण, संवर्धन आणि विकासात्मक कामे करण्यासाठी विविध योजनेतून मागील ०३ आर्थिक वर्षात रुपये ३९१.१२ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सदरच्या निधीचा विकासात्मक कामावर विनियोग करण्यात आलेला आहे.

तसेच सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात विकासात्मक कामांसाठी रुपये १४०.८२ लक्ष निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

-----------------

**बेलोरा-धामक (जि.यवतमाळ) या रस्त्यावरील पुलाच्या जोडरस्त्याचे काम त्वरीत करण्याबाबत**

**(३३) * ८४१५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोरा-धामक (जि.यवतमाळ) या रस्त्यावरील पुलाचे काम पूर्ण करण्यात आले असून पुलाच्या जोडरस्त्याचे काम प्रलंबित असल्यामुळे सदर काम त्वरीत करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांना दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोडरस्त्याचे काम त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) संबंधीत कंत्राटदारास अॅप्रोच चे काम तातडीने करण्याबाबत दि. ०२/०७/२०१५ रोजी कळविले असून काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत वाटप केलेल्या वहया निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत**

**(३४) * ७४२७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत वर्ग २ ते ५ मधील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता वहयांचा पुरवठा करण्याचा ठराव माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर करुन त्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वहया पुरवठा करण्याचे कंत्राट वर्धमान मार्केटींग कंपनीला देण्यात आले असता सदर कंपनीकडून निकृष्ट दर्जाच्या वहयांची किंमत मार्केट दरापेक्षा जास्त आकारली असल्याची बाब दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड येथील जिल्हा रुग्णालयात कुमारी मातेचा झालेला बेकायदा गर्भपात**

**(३५) * १०१७९ श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील जिल्हा रुग्णालयात रुग्णालय प्रशासनाशी संगनमत करुन कुमारी मातेचा बेकायदा गर्भपात करण्यात आल्याची बाब दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायद्याने २० आठवडयापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास गर्भपात करता येत नसतानाही २६ आठवडयांचा गर्भपात करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी अनेक सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी, बीड व आरोग्य यंत्रणेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
बीड येथील जिल्हा रुग्णालयात कुमारी मातेचा गर्भपात हा “गर्भपात कायदा १९७१” च्या तरतुदीनुसार करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
सदर रुग्ण २१ वर्षाची अविवाहीत मनोरुग्ण असून, सोनाग्राफी, क्ष-किरण इत्यादी वैद्यकीय चाचण्यांनुसार २० आठवडयांच्या व्यंग असलेला गर्भ असल्यामुळे, रुग्ण व तीच्या आईचे संमतीपत्र घेऊन गर्भपात करण्यात आला आहे.

(३) अशा प्रकारची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, हा गर्भपात "गर्भपात कायदा १९७१"चे पालन करुन करण्यात आला आहे. तसेच रुग्णालय प्रशासनाची कुठल्याही प्रकारचे संगनमत केल्याचे आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील महिला व नवजात शिशु रुग्णालयाबाबत**

**(३६) * ९३५० श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी मंजूर असलेले महिला व नवजात शिशु रुग्णालय माहे मे, २०१५ पर्यत कार्यान्वीत झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.
महिला रुग्णालय जागे अभावी कार्यान्वित झालेले नसून जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उपरी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या गावामध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(३७) * ८७४४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कायमस्वरुपी दुष्काळ हटविण्यासाठी राज्यशासनाने अनेक गावामध्ये जलयुक्त शिवार योजना सुरु केली आहे मात्र उपरी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) गावात अधिकाऱ्यांनी कागदोपत्री काम झाल्याचे दाखवून अपहार केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानामध्ये सन २०१५-१६ करिता निवडण्यात आलेल्या गावामध्ये मौजे उपरी ता.पंढरपूर या गावाचा समावेश नाही.

तथापि, नियमित योजनेतून दोन सिमेंट नाला बांध प्रस्तावित होते. त्यापैकी एक काम पूर्ण झाले असून एक काम शेतकऱ्यांच्या हरकतीमुळे अद्याप सुरु झालेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात दूषित रक्तपुरवठयामुळे होणारी एच.आय.व्ही. ची लागण

**(३८) * ९९२२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५५३१ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर याठिकाणी न्युक्लियक ॲसिड टेस्टिंग केंद्र उभारण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत तयार करण्यात आलेला प्रस्ताव राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडून केंद्र शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे काय,
(३) नसल्यास, उक्त प्रस्तावास मंजुरी मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यात दुषित रक्त पुरवठ्यामुळे एच.आय.व्ही.ची कोणालाही लागण होऊ नये म्हणून शासनाने कोणते विशेष धोरण आखले आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे,
(२) सदर प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजूरी अप्राप्त आहे.
(३) प्रस्ताव मंजूरीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) अन्न व औषध प्रशासन कायदा १९४० नुसार राज्यातील सर्व रक्तपेढयांवर अन्न व औषध प्रशासनामार्फत नियंत्रण करण्यात येते. या कायद्यानुसार राज्यातील सर्व रक्तपेढयांना एच.आय.व्ही, एच.सी.व्ही, व्ही.डी.आर.एल (सिफिलीस), मलेरिया, एच.बी.व्ही. या पाच चाचण्या करणे बंधनकारक असून त्यानुसार चाचण्या करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंजा (ता.उरण, जि.रायगड) बंदरातील शौचालयाची झालेली दुरवस्था**

**(३९) * ८८७५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजा (ता.उरण, जि.रायगड) बंदरातील शौचालयाची दुरवस्था झाली असून समुद्रातील लाटांच्या मा-यामुळे सदर शौचालयाचा पाया ढासळू लागला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषद व चाणजे ग्रामपंचायतीने करंजा जेटी जवळ शौचालयाची उभारणी केली असून संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे या शौचालयाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर बाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरी टाईम बोर्ड, मुंबई यांना ग्रामपंचायत चाणजे यांनी पत्र क्र. १४९, दि. १३.७.२०१५ अन्वये शौचालयाच्या दुरुस्तीबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आराठी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या ग्रामपंचायत हद्दीत केलेले अनधिकृत बांधकामे

**(४०) * ६७११ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आराठी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या ग्रामपंचायत हद्दीत अजवा पार्क ही वाणिज्य इमारत अकृषीक परवानगी नसताना अनधिकृत बांधकाम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीला अकृषिक परवानगी नसताना ग्रामपंचायतीने कोणत्या नियमांच्या आधारे वाणिज्य इमारत बांधकामास परवानगी देण्यात आली,

(३) तसेच आराठी परिसरात सातत्याने अनधिकृत बांधकामात वाढ होत असून या कामांसाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अनधिकृत बांधकाम करण्याऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

ग्रामपंचायत आराठी हद्दीत आजवा पार्क या नावाने इमारत बांधकाम परवानगी अर्ज नसून ग्रामपंचायत आराठीने आजवा पार्क या नावाने इमारत बांधकाम परवानगी दिलेली नाही.

परंतु ग्रामपंचायत आराठीकडे मासिक सभा दिनांक २९.११.२०१४ ठराव क्रमांक ५४ (६) अन्वये गट क्र ८१अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये मा. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांची पुर्व परवानगी घेऊन इमारतीचे बांधकाम करणेबाबत ग्रामपंचायत आराठीने बांधकाम परवाना दिलेला आहे.

(२) ग्रामपंचायत आराठीकडे श्रीमती शाहीन सज्जाद काळोखे व श्रीमती नासीमा शहबाज काळोखे यांचा दिनांक २९.११. २०१४ रोजी गट नं. ८१- अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये ६५x४५ या G+२ प्रमाणे इमारत बांधण्याची परवानगी मागितली असता सदर परवानगी अर्जासोबत ७/१२ उतारा, प्लॅन, नकाशा कागदपत्र जोडलेली आहेत. बिनशेती करण्यासाठी संबंधित यंत्रणेकडे केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत जोडलेली आहे. तसेच आरोग्य विभागाचा दाखला जोडण्यात आला आहे.

सदर अर्जावर सभेमध्ये चर्चा करण्यात आली असता, सचिवाचे मते सदरची G+२ इमारत बांधण्यापूर्वी त्यांनी जागेची बिनशेती परवानगी व जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील टाऊनप्लॅनिंग इत्यादी परवानगी असल्याशिवाय काम सुरु करता येणार नाही असे सुचित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराने आवश्यक त्या संबंधित यंत्रणेकडे याबाबत पत्रव्यवहार केला असल्यामुळे त्यांना ग्रामपंचायत आराठी मासिक सभा दिनांक २९.११.२०१४ ठराव क्र.५४(६) अन्वये गट नं ८१-अ क्षेत्र ०-२७-० या जमिनीमध्ये G+२ बांधकाम परवानगी देण्याबाबत एकमताने ठराव केलेला आहे.

(३) आराठी हद्दीत पर्यावरण विभागाची परवानगी न घेता बांधकाम सुरु केलेल्या इमारत बांधकामांना आराठी ग्रामपंचायतीने बांधकाम थांबविण्याच्या नोटीस बजावणेत आलेल्या आहेत.

(४) गट नं ८१-अ क्षेत्र ०-२७-० या जमीनीमध्ये इमारतीचे बांधकाम सुरु केलेले होते. सदर बांधकाम थांबविण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत आराठी पंचायतीने जा.क्र.१००५/२०१५ दिनांक ०७.०३.२०१५ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे व सदर इमारत बांधकाम सद्यस्थितीत बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) अशी बाब नाही.

-----------------

**नांदेड येथील कुंटूर ते देगाव पांदण रस्त्यावरील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामात केलेला गैरव्यवहार**

**(४१) * ८९३९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील कुंटूर ते देगाव पांदण रस्त्यावर कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम अपूर्ण तसेच निकृष्ट दर्जाचे करुन गुत्तेदाराने बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने २० लाख रुपये हडप केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सदरील बंधारा हा देगाव ते कुंटर नाल्यावर बांधण्यात येत असुन सदरील बंधाऱ्याचे फांउन्डेशनचे काम मे, २०१३ मध्ये पूर्ण झाले होते व त्याचे देयक रु.१९.४४ लक्ष अदा करण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावंतवाडी पंचायत समितीच्या नवीन इमारतीचे अपूर्ण असलेले काम**

**(४२) * ८९८५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी पंचायत समितीच्या नव्या इमारतीसाठी २ कोटी १५ लाख ३५ हजारांचा निधी मंजूर झाला असतानाही नव्या इमारतीचे काम रखडले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीच्या नव्या इमारतीचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) सावंतवाडी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या एकूण रु.२१५.३५ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास दिनांक १५.०५.२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यानुसार, त्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम हाती घेण्याच्या दृष्टीने नगररचनाकार यांच्याकडे प्रस्ताव सादर केला असता, काही बाबीस हरकत घेण्यात आल्याने, सुधारीत आराखडा जिल्हा परिषदेकडून मंजूरीसाठी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांच्याकडे दिनांक ३.०१.२०१५ रोजी सादर करण्यात आला असून, त्यांनी मंजुरी दिल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-------------------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयात**
**तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याबाबत**

**(४३) * १०५६१ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयात गेल्या २ ते ३ वर्षापासून तज्ञ डॉक्टरच उपलब्ध नसल्याने अति गंभीर आजार, अपघातग्रस्त रुग्ण, प्रसूतीसाठी येणाऱ्या महिला तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या शेकडो रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना औषधोपचार करण्यासाठी शेजारच्या राज्यातील म्हापसा व गोवा येथे जावे लागल्याने त्यांचे आर्थिक व शारिरीक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोडामार्ग ग्रामीण रुग्णालय इमारत तसेच कर्मचारी डॉक्टर राहत असलेल्या संपूर्ण इमारतीमध्ये पावसाळयात गळती होत असल्याने इमारतीमध्ये राहणे अवघड बनले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत राष्ट्रवादी पक्षाच्या तालुका अध्यक्ष, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग येथे वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गाची ३ पदे मंजूर असून सदर ठिकाणी दि.०१.०४.२०१२ पासून कार्यरत असलेल्या स्त्रीरोगतज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची शासन आदेश दि.३१.०५.२०१५ अन्वये बदली करण्यात आली आहे व इतर २ पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीत सदर ठिकाणी प्रतिनियुक्तीने २ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. अपघातग्रस्त किंवा अतिविशेषज्ञ प्रकारातील सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना उपचाराकरीता शेजारच्या राज्यात संदर्भीय करण्यात येते.

(३) हे अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग येथील मुख्य इमारतीवर लोखंडी पत्रे बसविण्यात आल्याने इमारतीमध्से पावसाळयात गळती होत नाही . तसेच, ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग येथे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या वापरात असलेल्या १३ इमारतीपैकी ७ इमारती सुस्थितीत असून ४ इमारतींच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(४) नाही.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ग्रेड पे रु. ५४००/-) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी २८७ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळीण व आसाणे (ता.आंबेगाव, जि.पुणे) या गाव हद्दीतील या बंधाऱ्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(४४) * १०६१५ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण व आसाणे (ता.आंबेगाव, जि.पुणे) या गाव हद्दीतील बुद्रा नदी पात्रालगत पाईरडोह या बंधाऱ्याचे काम अनेक वर्षापासून अपुर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्यासाठी निधी उपलब्ध असूनही ठेकेदार काम अर्धवट सोडून निघून गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बंधाऱ्याचे काम अपूर्ण असल्याने या परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांना शेती व इतर बाबींसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्यापासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बंधाऱ्यांचे लवकरात लवकर पूर्ण करुन नागरिकांना पाणी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

सदरचे काम माहे जून, २०१३ पासून बंद आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामाची मूळ प्रशासकीय मान्यतेची किंमत रुपये ५२५.२९ लक्ष ही होती. मार्च २०१५ अखेर सदर कामावर रुपये ५७४.४१ लक्ष इतका खर्च झाला आहे. सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रुपये १०५५.२४ लक्ष इतके आहे. सदर अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त न झाल्याने मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च करता येत नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

तथापि, तलावाचे कामांची तांत्रिक बाबींची पुर्तता तसेच प्रकल्प बाधीत शेतक-यांनी भुसंपादनास विरोध केल्याने काम सुरू करण्यास विलंब झाला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर लवकरात लवकर काम पूर्ण करण्यात येईल.

(५) प्रकल्पस्थळी पोहोचणेसाठी रस्ता उपलब्ध नसणे, भुसंपादनास शेतक-यांचा विरोध तसेच सविस्तर संकल्पने मंजूर करुन घेणे इत्यादी.

-----------------

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील डिंबे धरणाच्या**
**डाव्या कालव्यातून होणारी पाणी चोरी**

**(४५) * १०६४८ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि. पुणे) तालुक्यातील डिंबे धरणाच्या डाव्या कालव्यातून गिरवली गाव व परिसरातील अनेक गावातून पाणी चोरी प्रकल्प विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कुकडी विभागाचे उपअभियंता, शाखा अभियंता व कॅनॉल मुकादम हे जाणीपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार संबंधित विभागाचे नारायणगाव येथील कार्यकारी अभियंता यांचेकडे ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) या संदर्भात मौजे गिरवली ता. आंबेगाव जि.पुणे येथील एक ग्रामस्थ श्री.दत्तात्रय बंडू सैद यांनी दि.०७.०४.२०१५ रोजी लेखी तक्रार दिली आहे.

(३) उपरोक्त तक्रार अर्जानुसार संबंधित विभागीय कार्यालयाने प्रत्यक्ष पहाणी केली असता कोणतीही पाणी चोरी होत असल्याचे निदर्शनास आले नाही. या बाबत तक्रार दारास पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यात शालेय आरोग्य तपासणी मोहिम राबविली जात नसल्याबाबत**

**(४६) * ७४९१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय आरोग्य तपासणी मोहिमेअंतर्गत बीड जिल्ह्यात मागील शैक्षणिक वर्षात वैद्यकीय पथक आणि शिक्षण विभाग यांच्यात नियोजन नसल्यामुळे ही योजना राबविली गेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय आरोग्य तपासणी योजनेअंतर्गत उपलब्ध वाहन आणि संबंधित वैद्यकीय पथक यांनी केलेल्या कामाचा आढावा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय पथकाने किती शाळेमध्ये तपासणी केली आणि या तपासणीत आढळून आलेले निष्कर्ष कोणते,
(४) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता वैद्यकीय पथक आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त नियोजनातून वर्षभराच्या कार्यक्रमाची आखणी व नियोजन करण्यात आले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

बीड जिल्हयामध्ये सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला असून सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील सर्व २,९५१ शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाचा राज्यस्तरावरुन व जिल्हा स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात आला आहे.
(३) सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात बीड जिल्हयातील एकूण २,९५१ शाळांमधील ४,१६,३०७ विद्यार्थ्यांपैकी ३,७८,१६० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून १,१३,४८४ विद्यार्थ्यांवर औषधोपचार करण्यात आले आहेत. एकूण ५११ विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियेकरीता संदर्भित करण्यात आले होते. यामधील १८ विद्यार्थ्यांवर हृदय शस्त्रक्रिया, १९५ विद्यार्थ्यांवर दात, कान, नाक, घसा, हार्निया, तिरळेपणा व हाडांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. उर्वरीत ७४ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यास पालकांची संमती नसल्याने आणि ८२ विद्यार्थ्यांवर औषधोपचार चालू असल्यामुळे शस्त्रक्रिया करण्यात आल्या नाहीत. ८५ विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियेची गरज नसल्याचे तपासणीअंती आढळून आले. उर्वरीत ५७ विद्यार्थ्यांचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) होय.

सन २०१५-१६ वर्षात जून २०१५ पासून शाळांच्या तपासणीचे नियोजन करण्यात आले असून नियोजनाप्रमाणे शाळा तपासणीचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) भातसा धरणाच्या सुरक्षारक्षकांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत**

**(४७) * ९५०८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) भातसा धरणावर सुरक्षिततेच्या दृष्टीने ३३ सुरक्षारक्षक तैनात केले असून सुरक्षा रक्षकांना माहे ऑगस्ट, २०१४ पासून वेतनच अदा करण्यात आले नसल्याचे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तातडीने वेतन मिळावे म्हणून सदर सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांनी माहे ऑगस्ट, २०१४ पासून ते आजतागायत कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग, क्र. १ व अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचेकडे वारंवार मागणी करुनही अद्याप त्यांनी वेतन अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

भातसा धरणावरील सुरक्षा करणेकामी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचेकडील एकूण ३० सुरक्षा रक्षक व ३ पर्यवेक्षक कार्यरत असून त्यांचे माहे ०९/२०१४ ते ०५/२०१५ पर्यतचे वेतन व भत्ते निधी अभावी प्रलंबित होते. त्यापैकी माहे ९/२०१४ ते ४/२०१५ पर्यतचे वेतन माहे मे, २०१५ व जून, २०१५ मध्ये देण्यात आले आहे. तसेच मे, २०१५ व जून, २०१५ चे वेतन जुलै, २०१५ मध्ये करण्यांत आले आहे.

(२) सुरक्षा रक्षकांची माहे ०६/२०१५ पर्यतची सर्व वेतन व भत्यांची देयके अदा करण्यात आलेली असून सद्यस्थितीत कोणतेही देयक प्रलंबित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घोलवड (जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४८) * १०७९३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोलवड (जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे आदिवासी रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आरोग्य केंद्रात तात्काळ डॉक्टरांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र घोलवड जि. पालघर येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाचे १ पद मंजूर असून येथे बंधपात्रीत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गाचे १ पद मंजूर असून सदर पदावरील वैद्यकीय अधिकारी पदव्युतर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असल्याने सदर पदाचा कार्यभार जवळच्या जिल्हा परिषद दवाखान्यातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडे देण्यात आलेला आहे. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक त्या रुग्ण सेवा पुरविण्यात येत आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------

**जलसंधारण कामांची व्यवहार्यता तपासण्याबाबत**

**(४९) * ८४१७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतरच्या आणि पुर्वीच्या जलसंधारण कामांची व्यवहार्यता तपासण्याचे निश्चित करण्यात आले असून यासाठी जलसंधारण विभागाच्या मुख्य अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही समिती शून्य ते अडीचशे हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेली आणि प्रशासकीय मंजुरी मिळूनही सुरू न झालेली कामे किती उपयुक्त आहेत ते तपासून अहवाल शासनाला देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार राज्यातील किती जलसंधारणाची कामे सुरु व रद्द केली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाची दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरु झाली नाहीत अशा योजनांची (० ते २५० हेक्टर) तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी पुणे व नागपूर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाचा एक अभियंता यांची समिती शासन निर्णय, जलसंधारण विभाग, दिनांक ८ मे, २०१५ अन्वये गठीत करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) अहवाल प्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

**(५०) * ९७५८ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पाची किंमत १६ हजार १६६ कोटी रुपयावर पोहचली असून सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव तांत्रिक सल्लागार समितीकडे पाठविण्यात येवूनही अद्यापी मान्यता मिळाली नसल्याचे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

गोसीखुर्द प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने वेळोवेळी घेतलेल्या तुटीपुर्तता अहवाल क्षेत्रीय स्तरावरुन दिनांक १४ मे, २०१५ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावावर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस्तरावर छाननीचे काम प्रगतीपथावर आहे. समितीच्या जुलै महिन्यातील प्रस्तावित बैठकीत गोसीखुर्द प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहे.

(२) राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीत प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. त्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची पुर्तता प्रलंबीत होती.

(३) जुलै महिन्यातील राज्य तांत्रिक सल्लागार समितीचे बैठकीत गोसीखुर्द सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव विचारार्थ ठेवला जाईल. यानंतर शासन स्तरावर सु.प्र.मा.बाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माटुंगा (मुंबई) येथील डेव्हिड ससून औद्योगिक सुधारगृहातील मुलाचा झालेला मृत्यू

**(५१) * १०१६८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा (मुंबई) येथील डेव्हिड ससून औद्योगिक शाळा या सुधारगृहातील कु. आमीर जमील खान या मुलाचा नायर हॉस्पीटल, मुंबई येथे दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कु.आमीर या मुलास दिनांक १७ मे, २०१५ रोजीच्या रात्री सुधारगृहात दोन मुलांनी मारहाण केली होती व त्यामुळे त्याला नायर हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) प्रवेशित नामे आमीर खान याला दि. २०.०४.२०१५ रोजी बाल न्याय मंडळामार्फत दाखल करण्यात आले होते. सदर प्रवेशित दि. १८.०५.२०१५ पहाटे ३.३० वा संस्थेतून पळून जात असताना इतर प्रवेशितांनी त्याला मारहाण केल्याचे तपासात आढळून आलेले आहे. सदर प्रवेशित संस्थेत दि. २०.०५.२०१५ पर्यत होता व त्याने प्रकृती संदर्भात कोणतीही तक्रार केलेली नाही. दि. २०.०५.२०१५ रोजी बाल न्याय मंडळ यांचेकडून जामीन मंजूर झाल्यामुळे त्याला त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. तद्नंतर त्याच्या पालकांनी त्याला नायर रुग्णालयात दाखल केले होते. उपचारदरम्यान दि. २८.०५.२०१५ रोजी मृत्यू झालेला आहे.

(३) होय,

याबाबत तेव्हा कर्तव्यावर हजर असलेले श्री.बी.बी.रावळ (गृहपाल) श्री आप्पसाहेब वरफड (रक्षक) यांना सेवेतून निलंबित केलेले आहे. तसेच, श्री. तुषार भिलावेकर (अधिक्षक) यांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने सुमोटी पीआयएल दाखल करुन घेतली आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------------------

**जळगाव नेऊर (ता.येवला) व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक)**
**येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(५२) * ९३७४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव नेऊर (ता.येवला, जि.नाशिक) व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक २७ जुलै, २००९ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केलेला प्रस्ताव माहे मे, २०१५ पर्यत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त ठिकाणी तसेच आरोग्य सेवा संचालनायाने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार नाशिक जिल्ह्यात १६ ठिकाणी नवीन आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

निकष पूर्ण करत नसल्यामुळे मौजे जळगाव नेऊर ता.येवला व मौजे विंचूर ता.निफाड येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे,

(३) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयातील स्वाईन फ्ल्यू प्रादुर्भाव रोखण्याबाबत**

**(५३) * ९९२३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात स्वाईन फ्ल्यू रोखण्यासाठी विविध उपाय करुनही स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव अद्यापही कायम असून नाशिक जिल्हयात जानेवारी ते मे, २०१५ या कालावधीत सुमारे ३३ नागरिकांचा स्वाईन फ्ल्यूमुळे मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोनांबे (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील ४५ वर्षीय राजाराम डावरे यांचा दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्वाईन फ्ल्यूने मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आगामी सिंहस्थाचे पार्श्वभुमीवर नाशिक जिल्हयातील स्वाईन फ्लूयचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. तथापि ४१ लोकांचा मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नाशिक जिल्हयातील स्वाईन फ्ल्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर पुढील उपायायोजना करण्यात आल्या आहेत.

- दैनंदिन सर्वेक्षण.
- स्क्रिनिंग सेंटर व विलगीकरण कक्षाची स्थापना.
- सहवासितांचा शोध व आवश्यक उपचार.
- पुरेसा औषध साठा.
- शासकीय व खाजगी डॉक्टरांच्या कार्यशाळा.
- सिंहस्थासाठी अतिरिक्त वैद्यकीय पथकांची स्थापना.
- सिंहस्थासाठी जिल्हा रुग्णालय स्तरावर २०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित.
- आरोग्य शिक्षण व जनजागृती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माणगांव (जि.रायगड) तालुक्यात जेरबंद हत्तींच्या**

**पोषणासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत**

**(५४) * ८८७८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) तालुक्यात शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान करणाऱ्या तीन हत्तींना वन विभागाने जेरबंद केले, परंतु वन विभाग या हत्तीच्या खाद्य, औषधे व सोयीसुविधासाठी उसनवारी करुन हत्तीचे पोषण करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निरदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योग्य ते खाद्य व औषधाकरिता आर्थिक तरतूद करण्याच्या घोषणा करुन ती पूर्ण करण्यात येत नसल्याने या तीन हत्ती पैकी गणेश नामक हत्तीचा नुकताच मृत्यू झाला असून दोन हत्तींचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यातील वन्य हत्तींना माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये क्रॉलमध्ये बंदिस्त करण्यात आले आहे. औषधे व सोयीसुविधांसाठी पुरविण्याकरीता सन २०१४-१५ मध्ये केंद्र पुरस्कृत हत्ती योजनेअंतर्गत रु. ३८.२० लक्ष, जिल्हा योजना अंतर्गत रु. १८.३५ लक्ष व सन २०१५-१६ मध्से कॅम्पा योजनेंतर्गत रु. १०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) व (३) कर्नाटक राज्यातील डॉ.के.एस.उमाशंकर हत्ती तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली क्रॉलमध्ये बंदिस्त करण्यात आलेल्या वन्य हत्तींना योग्य ते खाद्य व औषधे वेळेवर देण्यात येत होते.

सदर तीन वन्य हत्तीपैकी गणेश हत्तीचा मृत्यू हा हदयविकारा (Congestive Cardiac Failure) मुळे व समर्थ हत्तीचा मृत्यू Stress Septicemia and Respiraratory Failure मुळे झाल्याचा पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच भीम या वन्यहत्तीची प्रकृती उत्तम आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-कोकण-गोवा महामार्गावर नागोठाणे परिसरात सुसज्य रुग्णालय व**

**ट्रामा केअर युनिट सुरु करण्याबाबत**

**(५५) * ९६४४ श्री.जयंत पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-कोकण-गोवा महामार्गावर सातत्याने अपघात होत असून अपघातग्रस्तांना मुंबई येथे उपचारासाठी जावे लागत असल्याने वाटेतच अपघातग्रस्त मृत्यू पावतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागोठाणे (ता.रोहा, जि.रायगड) अथवा आसपासच्या परिसरात सुसज्य सर्व सुविधायुक्त रुग्णालय बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली, हे खरे आहे काय,

(३) तसेच राष्ट्रीय महामार्गावरील अपघात लक्षात घेता नवीन ट्रामा केअर युनिट बृहत आराखडयानुसार आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र सुरु करण्याबाबत शासनानाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) मुंबई कोकण गोवा महामार्गावर सातत्याने अपघात होत असतात हे खरे आहे. परंतु या अपघातग्रस्तांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, पनवेल, पोलादपुर, ट्रामा केअर युनिट महाड, उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे तसेच महामार्गानजिक असलेल्या उपजिल्हा रुग्णालय पेण, रोहा व ग्रामीण रुग्णालय, चौक येथे दाखल करण्यात येते. काही गंभीर रुग्णांना जिल्हा रुग्णालय अलिबाग-रायगड व मुंबई येथे पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात येते. याशिवाय एन.एच.१७ या राष्ट्रीय महामार्गावर रायगड जिल्ह्यात महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेच्या एकुण ६ अतिसुसज्ज रुग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे आपदग्रस्तांना रुग्णालयात पोहोचताना रुग्णवाहिकेमध्येच रुग्णसेवा देता येते.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक १७.१.२०१३ च्या बृहत आराखड्यानुसार वडखळ नाका येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. पनवेल येथे मंजुर असलेल्या २० खाटांचे ट्रामा केअर युनिट व १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिमायतनगर तालुक्यात (जि.नांदेड) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी**

**योजने अंतर्गत विहिरी वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(५६) * ८९४० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर तालुक्यात (जि.नांदेड) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील सिंचनासाठी असलेल्या विहिरी या अल्पभूधारकांऐवजी धनाढ्य व श्रीमंत शेतकऱ्यांना देण्यात येत असल्याने येथील ग्रामपंचायतीची व अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अल्पभूधारक शेतकऱ्यांनी केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशी तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामपंचायतींना**
**इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५७) * ८९८८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना संगणक देण्यात आले असून अद्यापपर्यंत ७२ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज ऑनलाईन करण्यास फार मोठा अडथळा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंटरनेट सुविधा उपलब्ध नसलेल्या ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

राजापूर तालुक्यात एकूण १०१ ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी २८ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) ज्या ग्रामपंचातीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध असून रेंज नाही व ज्या ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध नाही. अशा ग्रामपंचायतीची डेटा एन्ट्री संगणकीकृत दाखले जवळच्या इंटरनेट सुविधा उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतीतून / गावातून काढण्यात येतात. तसेच दाखले देण्यासाठी ऑफलाईन पध्दतीची प्रणाली विभागाने विकसित करुन घेतली आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायतीची या ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे जोडून प्रत्येक ग्रामपंचातीला उच्च दर्जाची ब्रॉडबॅण्ड इंटरनेट कनेक्टीव्हीटी देण्याचा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीला राज्य स्तरावर सामंजस्य करारनामा स्वाक्षरी करुन पुढील कार्यवाहीस सुरुवात झालेली आहे. यामुळे सदर ग्रामपंचातींना उच्च दर्जा व क्षमतेची इंटरनेट कनेक्टीव्हीटी नि:शुल्क उपलब्ध होणार आहे.

तसेच राजापूर तालुक्यातील इंटरनेट सेवा उपलब्ध नसलेल्या ग्रामपंचयातीना दुरध्वनी व इंटरनेट कनेक्शन बसवून देणेबाबत जनरल मॅनेजर, भारत संचार निगम लिमिटेड, रत्नागिरी यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहार सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.